# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** इचलकरंजी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0056 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/02/2024 04:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/02/2024
**Time From (वेळेपासून):** 15:39 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/02/2024 **Time (वेळ):** 04:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/02/2024 04:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कसबा इचलकरंजी ,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

9. Parti

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विजय आण्णाप्पा यादव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 13/894/2, संतमळा,इचलकरंजी,हातकणंगले,इचलकरंजी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 13/894/2, संतमळा,इचलकरंजी,हातकणंगले,इचलकरंजी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल आनंदा जाधव | | | 1. कोरवी गल्ली, आगर रोड , शिरोळ,शिरोळ,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत<br>2. यशवंत रेसिडेन्सी, आरकेनगर, श,शहापूर इचलकरंजी, हातकणंगले,,इचलकरंजी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 8भारतीय चलनी नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 08/02/2024

मी विजय आण्णाप्पा यादव, वय- 45 वर्षे, व्यवसाय - बांधकाम व्यावसायिक रा. 13/894/2, संतमळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. मो. नं. 9422337979.समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 15/01/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, माझे नातेवाईक श्री राहुल संभाजी शेलार, रा.लंगोटे मळा, इचलकरंजी, ता.हातकणंगले यांना त्यांचे वडील श्री संभाजी शेलार यांनी इचलकरंजी येथील रिसन 452 क्षेत्र 0.0.90 आर इतकी मिळकत रजिस्टर बक्षीसपत्राने 2019 मध्ये दिलेली आहे. बक्षीसपत्राप्रमाणे राहुल शेलार यांचे नाव सात बारा पत्रकी लावण्याचे राहुन गेले होते. राहुल शेलार यांना त्यांचे कामाचे व्यापातुन वेळ मिळत नसल्याने त्यांनी मला सदर मिळकतचे सात बारा वरती नाव नोंद करणेसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे देवुन काम करून घेणेस सांगितले होते. त्याप्रमाणे मी सदरची कागदपत्रे घेवुन कसबा इचलकरंजी येथील तलाठी अमोल जाधव यांना भेटुन त्यांना नातेवाईक राहुल शेलार यांचे बक्षीसपत्राप्रमाणे नाव नोंद करणेसाठी कागदपत्रे दिली त्यावेळी तलाठी अमोल जाधव यांनी सात बारा पत्रकी नाव नोंद करणेसाठी 4,000/- रूपये दयावे लागतील तेंव्हाच काम होईल असे म्हणाले असे म्हणुन पैशाची मागणी केली. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 15/01/2024 रोजी तलाठी अमोल जाधव यांना भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी पोलीस निरीक्षक आसमा मुल्ला मॅडम हया स्टाफसह येवुन पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यानंतर मी व मुल्ला मॅडम फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. मी चंदुर रोडवर लायकर मळा येथे जावुन थांबलो होतो. काहीवेळाने मुल्ला मॅडम व त्यांचा स्टाफ, पंच असे लायकर मळा जवळ आले. त्यावेळी मी त्यांना भेटुन माझा वरीलप्रमाणे असलेला लेखी तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी मुल्ला मॅडम माझी शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. मुल्ला मॅडम यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन कसबा इचलकरंजी सजाचे तलाठी अमोल जाधव यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना दिल्या. त्यावेळी मी तलाठी जाधव हे त्यांचे कार्यालयात आहेत का याबाबत माहिती घेतली असता ते प्रांत कार्यालयात मिटींग करीता गेले असल्याचे समजले. त्यानंतर पुन्हा माहिती घेतली असता तलाठी जाधव हे कार्यालयात आले नसल्याचे समजलेने चालु कारवाई तात्पुरती स्थगीत करून दिनांक 17/01/2024 रोजी पुढील कारवाई करणेचे ठरले.

दिनांक 17/01/2024 रोजी मुल्ला मॅडम, स्टाफ व पंच असे पुर्वी भेटलेले ठिकाणी आली त्यावेळी त्यांनी तलाठी अमोल जाधव यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्ड चालु करून माझेजवळ दिले. मी व पंच नं.1 तलाठी जाधव यांना भेटणेस त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी तलाठी जाधव व माझी भेट झाली आमचेत माझे कामाविषयी बोलणे झाले त्यावेळी तलाठी जाधव यांनी दोन दिवसानी या असे सांगितलेने मी व पंच परत मुल्ला मॅडम थांबलेले ठिकाणी येवुन घडलेली हकीकत त्यांना सांगितली.

त्यानंतर चालु कारवाई तात्पुरती स्थगीत करून दिनांक 19/01/2024 रोजी पुढील कारवाई करणेचे ठरले त्याप्रमाणे दिनांक 19/01/2024 रोजी कारवाई केली असता त्यावेळी तलाठी जाधव यांची भेट झाली त्यावेळी आमचेत कामाविषयी बोलणे होवुन त्यांनी मला दिनांक 22/01/2024 रोजी बोलविल्याने सदर दिवशी पुढील कारवाई करणेचे ठरले.

दिनांक 22/01/2024 रोजी तलाठी कार्यालयात हजर नसलेचे मी मुल्ला मॅडम यांना कळविले होते. त्यानंतर मुल्ला मॅडम व मी फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. दिनांक 29/01/2024 रोजी मी मुल्ला मॅडम यांना फोन करून तलाठी जाधव हे दोन दिवस रजेवर असल्याचे कळविले होते. त्यावेळी त्यांनी पुढील कारवाई दिनांक 01/02/2024 रोजी करण्याची असलेबाबत सांगितले.दिनाक 01/02/2024 रोजी कारवाई सुरू करून मी व पंच तलाठी जाधव यांना भेटणेस गेलो असता तेथे तलाठी जाधव हे कार्यालयात नसल्याचे समजलेने आम्ही परत आलो.त्यामुळे चालु कारवाई तात्पुरती स्थगीत करून दिनांक 02/02/2024 रोजी पुढील कारवाई करणेचे ठरले.

दिनांक 02/02/2024 रोजी मुल्ला मॅडम, स्टाफ व पंच असे पुर्वी भेटलेले ठिकाणी आली त्यावेळी त्यांनी तलाठी अमोल जाधव यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्ड चालु करून माझेजवळ दिले. मी व पंच नं.1 तलाठी जाधव यांना भेटणेस त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी तलाठी जाधव हे बाहेर कोठेतरी गेले होते म्हणुन मी मंडल अधिकारी शिंदे साहेब यांना भेटलो त्यावेळी आमचेत माझे कामाविषयी बोलणे चालु होते त्यावेळी तेथे तलाठी जाधव साहेब आले मी त्यांना माझे काम करून दया ब-याचवेळी येवुन गेलो असे म्हणालो. त्यानंतर मी तुम्ही सांगितलेला पैशाचा विषय आता मी संपवतो असे म्हणालो त्यावेळी तलाठी जाधव पैशाचा विषय नसतय हो वेळ मिळणा असे म्हणाले. त्यावेळी मी हेच की म्हणजे कामाच पैशाचा विषय संपवतो म्हणुन सांगितले की तुम्हाला म्हटंले असे म्हणालो. त्यावेळी तलाठी जाधव यांनी तुम्हाला ते आज करून देतो असे म्हणाले त्यावेळी सर्कल शिंदे यांनी सोमवारी बघु तिकडे असे म्हणाले.त्यानंतर माझेत तलाठी व सर्कल शिंदे यांचेत माझे कामाविषयी बोलणे झाले त्यावेळी मी त्यांना माझे काम लवकर करून दया नुकसान होत आहे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच मुल्ला मॅडम थांबलेले ठिकाणी परत येवुन घडलेली हकीकत त्यांना सांगितली. त्यानंतर चालु कारवाई तात्पुरती स्थगीत करून दिनांक 05/02/2024 रोजी पुढील कारवाई करणेचे ठरले. दिनांक 05/02/2024 रोजी कारवाई केली त्यावेळी तलाठी जाधव व माझी भेट झाली त्यावेळी त्यांनी मला माझे कामात त्रुटी असल्याचे सांगुन इंडेक्स उतारा घेवुन परत येण्यास सांगितले. त्यावेळी मी परत येवुन आपणास घडलेली हकीकत सांगिती. त्यानंतर मी इंडेक्स उतारा घेवुन पुन्हा तलाठी जाधव यांना भेटण्यास गेलो असता ते ऑफीसमध्ये नसल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे चालु कारवाई तात्पुरती स्थगीत करून तलाठी जाधव हे ज्यावेळी भेटतील त्यावेळी पुढील कारवाई करणेचे ठरले.

दिनांक 07/02/2024 रोजी मी मुल्ला मॅडम यांना फोन करून तलाठी जाधव यांना भेटण्यास जाणार असल्याचे कळविले त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी त्या पंच व स्टाफसह पुर्वी भेटलेल्या ठिकाणी येत असल्याचे सांगितले. तलाठी अमोल जाधव यांचे लाच मागणीचे अनुषंगाने आवश्यक पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्ड चालु करून देवुन मला व पंच नं.1 असे तलाठी जाधव यांना भेटणेस पाठविले. त्यावेळी तेथे तलाठी जाधव यांची भेट झाली त्यांना मी त्यांनी सांगितलेली कागदपत्रे दिली. त्यावेळी त्यानी डायरी नोंद घातली व मला एक नोटीस काढुन दिली व त्यावर राहुल शेलार व संभाजी शेलार यांची सही व त्यांचे आधार कार्ड घेवुन परत येण्यास सांगितले. त्यानंतर मी तेथुन परत आलो  घडलेली हकीकत मुल्ला मॅडम यांना सांगितली. त्यानंतर मी नोटीस वरती राहुल शेलार व संभाजी शेलार यांच्या सहया व त्यांचे आधारकार्ड चे झेरॉक्स घेवुन आलो. त्यानंतर मला व पंच असे पुन्हा तलाठी जाधव यांना भेटणेस पाठविले मी तेथे जावुन जाधव यांना नोटीस व आधारकार्डच्या झेरॉक्स दिल्या. त्यावेळी किती दिवस लागणार उतारा मिळायला असे म्हणालो त्यावेळी जाधव तलाठी विस दिवस लागणार असे म्हणाले. त्यावेळी मी आणि काय करायच आहे का ते पैशाचे बोललेले असे म्हणालो त्यावेळी जाधव तुम्ही सांगितला म्हणुन मी काम केल असे म्हणाले त्यावेळी मी काय सर काय करायच बोला की असे म्हणालो त्यावेळी जाधव सांगाय कशाला लावताय आणि असे म्हणाले. त्यावेळी मी चार हजार बघा जास्त सांगु नका असे म्हणालो त्यावेळी जाधव देवुन जाणार नव्ह असे म्हणाले त्यावेळी मी हं.. आता नाही माझ्याकडे तेवढ... मघाशी सांगितले असता तर घेवुन आलो असतो असे म्हणालो. त्यावेळी जाधव आणा जावा की मग असे म्हणाले. त्यावेळी मी किती देवु असे म्हणालो त्यावेळी जाधव तलाठी यांनी हाताने मला पाच हजार रूपयाचा इशारा केला. त्यावेळी मी पाच हजार जास्त होतात साहेब असे म्हणालो त्यावेळी जाधव बर.. या जावा..जावा असे म्हणाले त्यावेळी मी चार हजार असे म्हणालो त्यावेळी जाधव या जावा येणार आहे नव्ह असे म्हणाले. त्यावेळी मी सांगितल्यात तेवढ देतो असे म्हणालो. त्यावेळी तलाठी जाधव ये झाल फायनल असे म्हणाले त्यानंतर मी व पंच नं.1 असे मॅडम थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. त्यावेळी

तलाठी जाधव हे माझे नातेवाईकाचे नाव सातबारा पत्रकी नोंद करणेकामी माझेकडे 5,000/- रूपये लाच मागणी करून तडजोडीअंती 4,000/- रूपयांची लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर लागलीच तलाठी जाधव यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 4,000/- रूपयांच्या नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझे शर्ट डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने मुल्ला मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन माझेकडील गाडीवरून तलाठी कार्यालय कसबा इचलकरंजी येथील कार्यालयाकडे निघालो. त्यावेळी आमचे पाठोपाठ मुल्ला मॅडम, पंच नं.2 व सापळा पथक आले. मी तलाठी कार्यालयाजवळ गेलो असता तलाठी कार्यालय बंद होते म्हणुन मी तलाठी जाधव यांना फोन केला असता त्यांनी मला सांगली रोडवरील फॉरच्युन सुपर मार्केटजवळ येण्यास सांगितले. त्यावेळी मी सापळा पथकास माझे पाठीमागुन येण्यास इशारा केला त्याप्रमाणे ते माझे पाठोपाठ येवु लागले. मी फॉरच्युन मार्केटजवळ आलो असता तलाठी जाधव यांचा मला फोन आला की घोरपडे नाटयगृहजवळ या असे म्हणाले मी घोरपडे नाटयगृहाजवळ गेलो मी आजुबाजुला तलाठी जाधव कोठे दिसतात का पाहीले असता ते मला गाडीवर बसुन फोनवर कोणाशी तरी बोलत असल्याचे दिसले. मी त्यांना भेटलो त्यावेळी आमचेत बोलणे झाले मी त्यांना पैसे ऑनलाईन काढुन घेवुन चावडीजवळ येतो तुम्ही तेथे या असे बोलणे झाले. त्यानंतर मी तेथुन निघुन तलाठी कार्यालयाजवळ आलो माझे पाठोपाठ सापळा पथकही तेथे आले व आजुबाजुला सापळा लावुन थांबुन राहीले. मी तलाठी जाधव यांना फोन लावला त्यानंतर काही वेळाने तलाठी जाधव हे त्यांचे कार्यालयाजवळ आले. त्यावेळी मी हां जाधव साहेब, तुम्ही सांगितल्या प्रमाण चार हजार रूपये आणलोय हे घ्या हाईत का बघा मोजुन घ्या असे म्हणुन पैसे काढुन तलाठी जाधव यांना पैसे दिले त्यावेळी तलाठी जाधव यांनी ते पैसे घेवुन काय कशाला मोजायचे असे म्हणाले. त्यावेळी मी मोजा हो... असे म्हणालो तलाठी जाधव तुमच्यावर विश्वास नाही होय असे म्हणाले त्यावेळी मी पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच मुल्ला मॅडम तसेच सापळा पथकातील अंमलदार पंच नं.2 असे सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह तलाठी जाधव यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही इचलकरंजी पोलीस ठाणे येथे येवुन पुर्ण करण्यात आली.

तरी माझे नातेवाईक श्री राहुल संभाजी शेलार, रा.लंगोटे मळा, इचलकरंजी, ता.हातकणंगले यांना त्यांचे वडील श्री संभाजी शेलार यांनी इचलकरंजी येथील रिसन 452 क्षेत्र 0.0.90 आर इतकी मिळकत रजिस्टर बक्षीसपत्राने 2019 मध्ये दिलेली आहे. बक्षीसपत्राप्रमाणे राहुल शेलार यांचे नाव सात बारा पत्रकी नोंद करणेसाठी कसबा इचलकरंजी येथील तलाठी अमोल जाधव यांनी माझेकडे 5,000/-रूपयांची अप्रामाणिकपणे मागणी करून तडजोडीअंती 4,000/- रूपयांची मागणी करून माझ्याकडुन त्यांनी बेकायदेशीरपणे 4,000/- रूपये लाच स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी अमोल आनंदा जाधव, वय- 39 वर्षे, पद- तलाठी, सज्जा - कसबा इचलकरंजी, वर्ग - 3, सद्या रा. बाबासाहेब डोळे यांचे घरी भाडयाने यशवंत रेसिडेन्सी, आर.के.नगर, शहापूर इचलकरंजी, मुळ रा. कोरवी गल्ली, आगर रोड शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Pravin Vitthal Khanapure (I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

२४/२४०२

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Pravin Vitthal Khan
**Rank(पद):** I (Inspector) ठाणे अंमलदार
**No.(सं.):** इचलकरंजी पोलीस ठाणे